दिनांक १५/०४/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कोस्टल झोन व टास्कफोर्स समितीची सभा आयोजित करण्यात आली होती. त्या सभेचे इतिवृत्त -

सदर सभेस खालीलप्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2. | मा.निवासी उपजिल्हाधिकारी | सदस्य सचिव |
| 3. | जिल्हा पोलीस उपअधिक्षक | सदस्य |
| 4. | जिल्हा अधिक्षक भूमी अधिलेख | सदस्य |
| 5. | उपविभागीय अधिकारी (सर्व) | सदस्य |
| 6. | नगर रचनाकार रत्नागिरी | सदस्य |
| 7. | मुख्याधिकारी न.प.चिपळूण | सदस्य |
| 8. | मुख्याधिकारी न.प.रत्नागिरी | सदस्य |
| 9. | तहसीलदार सर्व | |

मा.अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकी बाबत प्रस्तावित केले.

मा.अध्यक्ष महोदयांनी सीआरझेड नोटीफिकेशन २०११ नुसार, सीआरझेड क्षेत्रात कोणत्याही बांधकामास पर्यावरण विभागाची पुर्व परवानगी MCZM प्रधिकरणाकडून घेणे आवश्यक आहे अशा सूचना केल्या.

जिल्हा पोलिस उपअधिक्षक, रत्नागिरी यांनी एकही प्रकरण दाखल झालेले नाही असे सांगितले. उपविभागीय अधिकारी, खेड यांनी सीआरझेड क्षेत्रात विनापरवाना बांधकाम केलेल्या बांधकाम धारकांना नोटिसा देणेत आलेबाबत सांगणेत आले.

सीआरझेड क्षेत्रात विनापरवाने बांधकामे आहेत किंवा कसे? याबाबत सर्वेक्षण करुन पथकप्रमूख, उपविभागीय अधिकारी (सर्व) यांनी आपला अहवाल १० मे २०१५ पर्यंत या कार्यालयात सादर करणेबाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.

पथक प्रमूख यांनी अद्याप अहवाल सादर केलेला नसल्याने त्यांना कारणे दाखवा नोटिस काढणे बाबत मा.अध्यक्ष यांनी सूचना दिल्या.

वरील प्रमाणे सूचना मा.अध्यक्ष महोदयांनी दिल्या व उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे जाहिर केले

क्र.मह/कार्या-०१/सभा/२०१५
जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
दिनांक ०१/०७/२०१५

**स्थळप्रत मा. जिल्हाधिकारी यांचे सहीची आहे.**

**जिल्हाधिकारी रत्नागिरी करीता**

प्रत:- १) मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथॉरिटी, पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३० यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.
२) सर्व सदस्य यांना माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी.
३) सर्व तहसीलदार यांना माहितीसाठी व जरुर त्या कार्यवाहीसाठी.

दि. 2 JUL 2015 पाठविले
बारनिशी लिपिक